सन २०१७-१८ करीता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२३१७/प्र.क्र.२३८/क्रीयुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २६ मार्च, २०१८.

<u>वाचा :-</u>

१) **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१, दिनांक ०१ मार्च, २०१४.**
२) **वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८.**
३) **सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/ २०१७-१८/२१२/का.९/७५१, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ चे पत्र.**
४) **सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे क्र.क्रीसुनि/आर्थिक सहाय्य/२०१५-१६/का.९/३२६७, दिनांक ३० जून, २०१७ चे पत्र.**
५) **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडायो-२३१७/प्र.क्र.२३८/क्रीयुसे-१, दिनांक १५.०३.२०१८.**

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील खाजगी/शासनाच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्य शासनाच्या संबंधित विभागांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्था, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना इत्यादींना क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहित्यासाठी ७५:२५ (शासन व संबंधित संस्था) या प्रमाणात अनुदान देण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. "क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे" ही क्रीडा धोरणातील एक महत्वाची शिफारस आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करुन त्याव्दारे खेळाडूंच्या कामगिरीत वाढ करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्यास चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या संदर्भातील सविस्तर कार्यपध्दती संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य

करण्यात आलेल्या संस्थांना उर्वरीत निधी वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन निर्णय संदर्भाधिन क्र.५ अधिक्रमीत करुन सन २०१७-१८ या वर्षाकरिता क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्याकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून ८०% च्या मर्यादेत रु.१८०.०१ लक्ष (अक्षरी रुपये एक कोटी ऐंशी लाख एक हजार फक्त) इतकी तरतुद सोबतच्या सहपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या संस्थांकरीता वितरीत करण्यास व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

(१) संबंधित संस्थेस सोबतच्या सहपत्रात दर्शविल्याप्रमाणे अनुदान वितरित झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्रकल्पाच्या छायाचित्रासह व उपयोगिता प्रमाणपत्रासह लवकरात लवकर व कमाल १ वर्षाच्या कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा वितरित अनुदान शासनाच्या प्रचलित दंडनीय व्याज दराने अनुदान वितरित झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल, ही अट मान्य असल्याचे हमीपत्र प्रतिज्ञापत्राद्वारे संबंधित संस्थेकडून घेण्यात यावे. तसेच संबंधित संस्थेस एकूण मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या १०% रक्कमेची बँक गॅरंटी घेणे आवश्यक राहील. त्यानुसार बँक गॅरंटी व प्रतिज्ञापत्र संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आल्यानंतर मंजुर २५% निधी संबंधित संस्थेस आर.टी.जी.एस. द्वारे वितरीत करण्यात यावा.

(२) प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे शासन अनुदान व संस्था हिस्सा खर्च करुन विनियोग प्रमाणपत्र व प्रकल्प पुर्णत्वाचा दाखला १ वर्षाच्या कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक राहील.

(३) संबंधित संस्थेने विनियोग प्रमाणपत्र, प्रकल्प पुर्णत्वाचा दाखला व खर्चाचा अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर संबंधित संस्थेची बँक गॅरंटी मुक्त करण्यात यावी.

(४) सोबतच्या सहपत्रातील अ.क्र.९ व १० मधील संस्थांनी आवश्यक त्या सर्व अटींची पूर्तता केल्यानंतर निधी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी संबंधित संस्थांना वितरीत करावा.

२. उपरोक्त अटींच्या अधिन राहून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्याकरिता संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रक अधिकारी म्हणून

घोषित करण्यात येत आहे. या संदर्भातील तरतूद संबंधित संस्थेस वितरित करताना वित्त विभाग दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक २४.०७.२०१५ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. या योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

"मागणी क्र.ई-३ लेखाशिर्ष २२०४ क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (४०) क्रीडा सुविधा (४०) (०१) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी सहाय्य करणे (२२०४ ५७०६) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)."

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२६१६०९४८१६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.26 16:12:52 +05'30'

(राजेंद्र पवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय ,मुंबई.
२) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा ,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
३) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव.
४) महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता ,महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल लेखा व परिक्षा,महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा /सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत)
७) वित्त विभाग व्यय/५ अर्थ-८ ,मंत्रालय ,मुंबई.
८) नियोजन विभाग, का-१४७१ ,मंत्रालय ,मुंबई.
९) कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
१०) निवड नस्ती क्रीयुसे १.

शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२३१७/प्र.क्र.२३८/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च, २०१८

क्रीडा सुविधा निर्मिती मंजूर प्रस्ताव उर्वरीत देय अनुदान सन २०१५-१६

सन २०१७-१८ करीता "क्रीडा सुविधा निर्मितीसाठी" मंजूर आर्थिक सहाय्य.

सहपत्र

रु. (लाखात)

अ.क्र.	संस्थेचे नाव	प्रकल्प	राज्य शासन अनुदान मर्यादा	वितरीत निधी	वितरीत करावयाचा उर्वरीत निधी
१	सर्च फाउंडेशन, चंद्रपूर	बंदिस्त प्रेक्षागृह	६७.५०	५०.६२	१६.८८
२	संस्कृती संवर्धन मंडळ, शारदानगर, सगरोळी, नांदेड	जलतरण तलाव	९०.००	६७.५०	२२.५०
३	पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेंशनचे मेडीकल कॉलेज, दिवळघाट, जि.अहमदनगर	जलतरण तलाव	९०.००	६७.५०	२२.५०
४	समर्पण संस्था, जळगांव	बंदिस्त प्रेक्षागृह	३०.००	२२.५०	०७.५०
५	आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसा. चे के.डी.गावीत इंग्लिश मेडी. स्कूल, पथराई, ता.जि.नंदुरबार	बंदिस्त प्रेक्षागृह	९०.००	६७.५०	२२.५०
६	विवेकानंद प्रतिष्ठान, जळगांव	बंदिस्त प्रेक्षागृह	९०.००	६७.५०	२२.५०
७	शहादा तालुका को.ऑप.एज्यु. सोसायटी, शहादा, जि.नंदुरबार	बंदिस्त प्रेक्षागृह	९०.००	६७.५०	२२.५०
८	हिरा फाऊंडेशन, नंदुरबार, जि.नंदुरबार	जलतरण तलाव	४५.००	३३.७५	११.२५
९	नवकोकण एज्यु. सोसायटीचे डी.बी.जे.कॉलेज, चिपळूण, जि.रत्नागिरी	बंदिस्त प्रेक्षागृह	९०.००	६७.५०	२२.५०
१०	सार्वजनिक बजरंग व्यायामशाळा, देवळी, जि.वर्धा	जलतरण तलाव	३७.५०	२८.१२	०९.३८
एकुण					**१८०.०१**

(एकुण रुपये एक कोटी ऐंशी लाख एक हजार फक्त)

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.26 16:13:14 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन